6 APR 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अधिकार मंडळ राजकीय नव्हे; शैक्षणिक सभागृह

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अधिकार मंडळांना कानपिचक्या

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

विद्यापीठातील विविध अधिकार मंडळाच्या माध्यमातून ज्ञानाचे अधिष्ठान प्राप्त झाले आहे. या मंडळांसाठी संकेतसूची तयार करून या सभागृहात ज्ञानाधिष्ठित चर्चा होणे अपेक्षित आहे. अधिकार मंडळ राजकीय नव्हे तर शैक्षणिक सभागृह आहे, अशा कानपिचक्या कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी अधिकार मंडळाला दिल्या.

शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर सभागृहात आयोजित अधिकार मंडळाच्या कामकाजाबाबत कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या शिबिरासाठी विविध अधिकार मंडळाचे डीन, सदस्य उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, एखाद्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी अधिकार मंडळासह विद्यापीठ प्रशासनात समन्वय असला पाहिजे. विद्यापीठाकडून



कोणत्याही कामाला विलंब होऊ नये म्हणून एक समिती नेमून सूची तयार केली जाईल. नवीन कायद्यानुसार व्यवस्थापन परिषदेने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी विद्यापीठ प्रशासन बांधिल राहिल. अद्ययावत अभ्यासक्रम, विविध योजना, विद्यापीठ विकास आराखडा यासंदर्भात अभ्यासमंडळांनी प्रत्येक घटकाशी चर्चा करून, व्यापकता वाढवली पाहिजे. कायद्याचा विचार करून प्रत्येक निर्णय घेणे अपेक्षित आहे. आपल्यातील गुणवत्ता सिद्ध करून विद्यापीठ विकासावर भर देण्यासाठी सर्वांची अधिकार मंडळावर निवड झाली आहे, याचे भान प्रत्येकाने ठेवण्याची आवश्यकता असल्याचा सल्लाही डॉ. शिंदे यांनी दिला.

डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, नवीन कायद्यानुसार विद्याशाखांचे नामांकन केले असून पूर्वीच्या विद्याशाखा रद्दबादल करीत नवीन चार विद्याशाखांची निर्मिती केली आहे. हा कायदा विद्यार्थी केंद्रित असून संशोधनाला चालना देणारा आहे. कोणताही परिनियम करण्यासाठी एक वर्षाचा कालावधी जाऊ शकतो, एकरूप परिनियम तयार करण्याची तरतूद नवीन कायद्यात केली आहे, असे सांगत, नवीन कायद्याची संपूर्ण माहिती अधिकार मंडळातील सदस्यांना दिली.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी 'अधिकार मंडळांच्या बैठकांची कार्यपद्धती" तर परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी 'परीक्षा कामकाजातील अधिकार मंडळाचा सहभाग" या विषयावर तर प्रभारी वित्त व लेखा अधिकार अजित चौगुले यांनी 'विद्यापीठाची वित्तीय व्यवस्था" विषयावर मार्गदर्शन केले. उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी कार्यशाळेचे नियोजन केले.

### ४० वर्षातील प्रलंबित कामे दोन वर्षात पूर्ण होतील

शिवाजी विद्यापीठामध्ये ४० वर्षापासून काही कामे प्रलंबित आहेत. नवीन कायद्यानुसार ही कामे येत्या दोन वर्षात करणे, सहज शक्य होणार आहे, अशी माहिती प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

### अधिकार मंडळांना प्रशिक्षण देणारे पहिले विद्यापीठ

अधिकार मंडळांना प्रशिक्षण देणारे शिवाजी विद्यापीठ पहिले आहे. तसेच सर्व अधिकार मंडळातील सदस्यांना ओळखपत्र देण्याचे काम सुरू असून, येत्या काही दिवसात सर्व सदस्यांना ओळखपत्र दिले जाईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी यावेळी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 APR 2018
सकाळ

# अधिकार मंडळांत ज्ञानाधिष्ठित चर्चा व्हावी

## कुलगुरू डॉ. शिंदे : विद्यापीठात अधिकार मंडळांची कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ५ : 'विद्यापीठातील सर्व अधिकार मंडळे, सभागृहे ही शैक्षणिक स्वरूपाची आहेत, हा महत्त्वाचा संकेत ध्यानी ठेवून या सभागृहांत ज्ञानाधिष्ठित चर्चा व्हावी,' अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे व्यक्त केली.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदानुसार नव्याने अस्तित्वात आलेल्या अधिसभा, विद्यान परिषद आणि व्यवस्थापन परिषद यांसह विविध अधिकार मंडळांच्या सदस्यांसाठी झालेल्या कार्यशाळेत ते बोलत होते. विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर सभागृहात ही कार्यशाळा झाली.

अधिनियम, परिनियम, विविध अधिकार, नियम, संकेत आदींविषयी अवगत करण्यासाठी शिवाजी विद्यापीठात आज अधिकार मंडळांची कार्यपद्धती यावर ही एकदिवसीय कार्यशाळा झाली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, "विद्यापीठ कायदा हा विद्यार्थीकेंद्री असून, संशोधनास चालना, उद्योगांसमवेत सहकार्यवृद्धी आणि



**मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.**

सामाजिक जबाबदारीचे भान अधोरेखित करणारा आहे. या चतुःसूत्रीच्या आधारे क्षमता संवर्धन (कॅपॅसिटी बिल्डिंग) करण्याच्या दृष्टीने सर्वच अधिकार मंडळांनी कार्य करणे अभिप्रेत आहे. त्यासाठी कायदा आणि उपरोक्त चार स्तंभांच्या आधारे व्यवस्था समजून घेण्याची मानसिकता निर्माण व्हायला हवी. त्याद्वारे कायदा जाणीवपूर्वक समजून घ्या आणि सहकाऱ्यांनाही सांगा." या वेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडेंसह विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांचे सदस्य, प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

6 APR 2018 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सभागृहात ज्ञानाधिष्ठित चर्चा व्हावी

## कुलगुरू डॉ. शिंदे; विद्यापीठात अधिकार मंडळांच्या कार्यपद्धतीवर कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यापीठामधील सर्व अधिकार मंडळे, सभागृहे ही शैक्षणिक स्वरूपाची आहेत, हा महत्त्वाचा संकेत ध्यानी ठेवून या सभागृहांमध्ये ज्ञानाधिष्ठित चर्चा व्हावी, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केली.

'अधिकार मंडळांच्या कार्यपद्धती' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. वि. स. खांडेकर सभागृहात झालेल्या या कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी उपस्थित सदस्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठ कायदा हा अत्यंत विद्यार्थिकेंद्रीत असून संशोधनास चालना, उद्योगांसमवेत सहकार्य वृद्धी आणि सामाजिक जबाबदारीचे भान अधोरेखित करणारा आहे. या चतु:सूत्रीच्या आधारे क्षमता संवर्धन (कॅपॅसिटी बिल्डिंग) करण्याच्या



विद्यापीठातून...

दृष्टीने सर्वच अधिकार मंडळांनी कार्य करणे अभिप्रेत आहे. त्यासाठी कायदा आणि वरील चार स्तंभांच्या आधारे व्यवस्था समजून घेण्याची मानसिकता निर्माण व्हायला हवी. त्याद्वारे कायदा जाणीवपूर्वक समजून घ्या आणि आपल्या सहकाऱ्यांनाही समजून सांगा. ही कायदा समजून घेण्याची प्रक्रिया निरंतर असून त्याचा अभ्यास आणि त्या अभ्यासाचा स्वत:बरोबरच इतरांना आणि व्यवस्थेला सकारात्मक लाभ करून देणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे.

विद्यापीठाच्या सर्व अधिकाऱ्यांशी अधिकार मंडळ सदस्यांचा थेट संवाद प्रस्थापित होणे गरजेचे आहे. आपल्या सूचना, समस्या, प्रश्नांची मांडणी करणे जितके महत्त्वाचे, तितकेच त्यासाठीचा पाठपुरावाही महत्त्वाचा आहे. विद्यापिठीय अधिकार मंडळांच्या निर्मितीमागे कायद्याने विद्यार्थी व विद्यापीठ विकासाचे लक्ष्य बाळगले असून त्याच्या साफल्याच्या दृष्टीने अधिकार मंडळ सदस्यांनी कार्यरत राहायला हवे. असे क्षमताधिष्ठित सदस्य घडविणे, हाच या कार्यशाळेच्या आयोजनामागील प्रमुख हेतू असल्याचेही कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे उपस्थित होते.कार्यशाळेस विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांचे सदस्य, प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 APR 2018
पुण्यनगरी

# अधिकार मंडळांनी क्षमता संवर्धनाचे काम करावे

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे आवाहन

**कोल्हापूर/ प्रतिनिधी :**

क्षमता संवर्धन करण्याच्या दृष्टीने सर्वच अधिकार मंडळांनी काम करणे आवश्यक आहे. विद्यापीठ कायदा हा विद्यार्थी केंद्रित आहे. त्यासह संशोधनास चालना, उद्योगांसमवेत सहकार्यवृद्धी आणि सामाजिक जबाबदारीचे भान अधोरेखित करणारा आहे. त्यासाठी कायदा आणि उपरोक्त चार स्तंभांच्या आधारे व्यवस्था समजून घेण्याची मानसिकता निर्माण व्हायला हवी, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी गुरुवारी येथे केले.

वि. स. खांडेकर सभागृहात झालेल्या विद्यापीठातर्फे आयोजित अधिकार मंडळांची कार्यपद्धती या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा-२०१६ नुसार नव्याने अस्तित्वात आलेल्या अधिसभा, विद्या परिषद आणि व्यवस्थापन परिषद यांसह विविध अधिकार मंडळांच्या सदस्यांना अधिनियम, परिनियम, विविध अधिकार, नियम, संकेत आदींची माहिती देण्यासाठी विद्यापीठातर्फे ही कार्यशाळा घेण्यात आली. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठ कायदा समजून घेण्याची प्रक्रिया निरंतर आहे. त्याचा अभ्यास आणि त्या अभ्यासाचा स्वतःबरोबरच इतरांना आणि व्यवस्थेला सकारात्मक लाभ करून देणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. विद्यापीठामधील सर्व अधिकार मंडळे, सभागृहे ही शैक्षणिक स्वरूपाची आहेत. हा महत्त्वाचा संकेत ध्यानी ठेवून या सभागृहांमध्ये ज्ञानाधिष्ठित चर्चा व्हावी. या कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, विविध अधिकार मंडळांचे सदस्य, प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

6 APR 2018
तरूण भारत

# वाय-फाय सुविधेमुळे संशोधनास मदत

## विद्यापीठातील विद्यार्थ्यांना माफक दरात वाय-फाय सुविधा उपलब्ध : मोबाईल मात्र कव्हरेज क्षेत्राच्या बाहेर

प्रतिनिधी
कोल्हापूर

सोशल मीडियाच्या युगातील विद्यार्थ्यांची तंत्रज्ञानासोबत मैत्री अधिक वेगाने व्हावी, यासाठी शिवाजी विद्यापीठ आणि रिलायन्स जिओ यांच्यामध्ये करार झाला आहे. या करारांतर्गत सुरू असलेल्या योजनांमुळे तंत्रज्ञानासोबत संशोधन या संकल्पनेला वेग मिळत आहे. विद्यापीठ परिसरात जिओ वाय–फाय कनेक्शनचे उद्घाटन झाले असून, सध्या ५ हजारपेक्षा जास्त युजर आहेत.

तंत्रज्ञानाच्या युगात देशभरातील सर्वच विद्यापीठ व महाविद्यालये वायफाय युक्त झाली आहेत. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाने जिओ रिलायन्सबरोबर सामंजस्य करार करून विद्यापीठातील विद्यार्थ्यांना माफक दरात जिओची वाय–फाय सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या करारांतर्गत जिओ १० ते ५० एमबी इंटरनेट विद्यार्थ्यांना नि: शुल्क मिळत आहे. त्यानंतर जेवढे एमबी इंटरनेटचा वापर होईल तितकेच शुल्क संबंधीत विद्यार्थ्याला मोजावे लागणार आहे. प्रस्तावित विद्यापीठातील वाय–फाय सेवेचा वेग जास्त असल्यामुळे विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या मदतीने संशोधनासाठी नवी माहिती मिळवणे सहज शक्य होत आहे. वाय–फाय सुविधेसाठी लागणारी उपकरणे व देखभालीचा खर्च रिलायन्स जिओने केला असून, रिलायन्सने जिओधारकांना मोफत व इतर कंपन्यांच्या कार्डसाठी माफक दरात वायफाय सुविधा उपलब्ध करून दिली आहे.



▪ **मोबाईल टॉवरचा विषय व्यवस्थापन परिषदेसमोर येण्याची शक्यता**

**व्यवस्थापन परिषदेसमोर टॉवरचा विषय निर्माण होण्याची शक्यता**

विद्यापीठ परिसरासह मुख्य इमारतीमध्ये मोबाई रेंज नसल्याने संपर्क साधण्यास अनेक अडचणी निर्माण होतात. त्यामुळे विद्यापीठ परिसरात मोबाईल टॉवर असावा अशी काहींची मागणी आहे. तर शिवाजी विद्यापीठाला ऑक्सीजन हब म्हणून ओळखले जाते. विद्यापीठ परिसरात अनेक प्रकारचे पक्षी, व वनस्पतीही पाहावयास मिळतात, म्हणून पर्यावरणवादी संघटनांचा या टॉवरला विरोध आहे. त्यामुळे आजतागायत विद्यापीठ परिसरामध्ये मोबाई टॉवर नाही. मात्र भविष्यात व्यवस्थापन परिषदेसमोर मोबाईल टॉवरचा विषय येण्याची दाट शक्यता आहे.

### वाय-फाय सुविधेच्या लाभार्थ्यांमध्ये वाढ

जिओने सुरू केलेले वायफायचे काम पूर्ण झाले असून वायफाय रेंज आणि इतर सुविधांची तपासणी (टेस्टींग) पूर्ण झाली आहे. विद्यार्थी केंद्रीत दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून विद्यापीठाने जिओबरोबर वायफायचा करार केला आहे. सध्या वायफाय सुविधा घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे. जिओच्या स्थानिक कार्यालयामार्फत या सुविधेवर नियंत्रण ठेवण्यात आले आहे.

–डॉ. नांदवडेकर (कुलसचिव)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 APR 2018
Times of India

# Kanbarkar award for Jabbar Patel

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Veteran Marathi film director-cum-producer Jabbar Patel will be conferred with the Principal R K Kanbarkar award on April 13 at Shivaji University, Kolhapur (SUK).

This is the third year of the award. Last year, Satara-based Rayat Shikshan Sanstha was honoured with the award. When the award ceremony started, it was first conferred to eminent scientist and Bharat Ratna C N R Rao.

Every year, the award is conferred on April 13, the birth anniversary of R K Kanbarkar. The selected candidate gets a cash prize of Rs. 1.51 lakh, a memento and a shawl.

SUK vice-chancellor Devanand Shinde said Patel's contribution in the field of art and cinema is quite vast and that the university is honoured to confer him with this award.

J F Patil, the search committee member for the award, said Patel has immense contribution in the field of theatre and cinema, especially in the Marathi cinema and theatre and to honour his contribution, he will be conferred with the award on April 13.

University officials said Patel was born in Pandharpur, Solapur district on June 23, 1942 and is a qualified doctor. His passion for theatre and films started to grow with experimental plays and he eventually made a career out of it.

Officials added Patel, who directed Ghashiram Kotwal—an adaptation of Vijay Tendulkar's play— attracted a massive audience through the years.

His films like 'Samna', 'Jait Re Jait', 'Sinhasan', 'Umbartha' and 'Dr Babasaheb Ambedkar' are still counted as his best cinematic works.

It has to be noted that R K Kanbarkar, an octogenarian social activist, was the vice chancellor of SUK from 1980 to 1983. He was the frontline leader of several progressive movements in the city. He was also an executive member in several social and educational organizations in the city. He played an active role in the creation of the University act in 1974.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 APR 2018
लोकमत

# सर्व विभागांना शुद्ध पाणी पोहोच



शिवाजी विद्यापीठाने रिव्हर्स ऑस्मॉसिस (आर. ओ.) तंत्रज्ञानावर आधारित असणारा जलशुद्धिकरण प्रकल्प, सेमी-ऑटोमॅटिक प्रकारातील बॉटलिंग प्लँट आरोग्य केंद्रामागील परिसरात वर्षभरापूर्वी कार्यान्वित केला आहे. सुमारे ५००० लिटर प्रतितास इतक्या शुद्धिकरण क्षमतेच्या या प्रकल्प उभारणीचे काम अभियांत्रिकी विभागाने केले आहे.

**शिवाजी विद्यापीठ**

यासाठी विद्यापीठाच्या निधीतून १७ लाख ५० हजार रुपये खर्च करण्यात आले आहेत. विद्यापीठातील अधिविभाग, प्रशासकीय विभाग, वसतिगृहे, अतिथिगृह, कँटीन आणि विद्यापीठातील निवासस्थानांमध्ये राहणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांना या प्रकल्पातून रोज एकत्रितपणे सुमारे ७० हजार लिटर शुद्ध पाणी पुरविण्यात येते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 APR 2018
सकाळ



कोल्हापूर : फेन्सिंग स्पर्धेत यश मिळविलेल्या खेळाडूंच्या सत्कार प्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा नियंत्रक डॉ. महेश काकडे आदी.

# फेन्सिंगमधील विजेत्यांचा सत्कार

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करताना अमृतसर (पंजाब) येथे झालेल्या अखिल भारतीय पुरुष फेन्सिंग (तलवारबाजी) ईपी क्रीडा प्रकारामध्ये अक्षय देशमुख यांनी वैयक्तिक कास्यपदक पटकावले. तसेच महिला फेन्सिंग खेळाडू अंकिता पाटील, श्रेया जाधव, ज्योती सुतार यांनी पतियाळा पंजाब येथे झालेल्या अखिल भारतीय फेन्सिंग (तलवारबाजी) सेबर क्रीडा प्रकारामध्ये सांघिक कास्यपदक पटकावले. खेळाडूंना प्रशिक्षक व व्यवस्थापक डॉ. राहुल मगदूम, डॉ. धनंजय पाटील, श्री. दादासो नांगरे-पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्वांचे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सत्कार केला. तसेच पुढील कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. अमित कुलकर्णी, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक श्री. महेश काकडे, क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड हे उपस्थित होते.

16 APR 2018 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फार्मसी अभ्यासक्रम मंडळाच्या अध्यक्षपदी डॉ.एच.एन.मोरे



**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठाच्या फार्मसी अभ्यासक्रम मंडळाच्या अध्यक्षपदी भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे यांची निवड करण्यात आली आहे.

मोरे यांनी आतापर्यंत देशपातळीवरील फार्मसी कार्यशाळांमध्ये आपला सहभाग नोंदवला आहे.

या निवडीबद्दल त्यांचे विद्यापीठातर्फे अभिनंदन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 APR 2018
सकाळ

# डॉ. प्रमोद लंबे अभ्यास मंडळावर



**प्रमोद लंबे**

नागाव, ता. ५ : आष्टा (ता. वाळवा) येथील अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ एज्युकेशन (बीएड) चे प्राचार्य डॉ. प्रमोद कल्लाप्पा लंबे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अभ्यास मंडळावर निवड झाली. श्री. लंबे मूळचे नागाव (ता. हातकणंगले) येथील रहिवासी होत. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी त्यांना निवडीचे पत्र दिले. श्री. लंबे यांना संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री अण्णासाहेब डांगे, सचिव राजेंद्र डांगे, व्यवस्थापक सुनील शिणगारे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

6 APR 2018 लोकमत



शिवाजी विद्यापीठ परिसरात भिजण्याचा आनंद विद्यार्थिनींनी असा लुटला.